# देगलूर महाविद्यालयात व्यक्तिमत्व विकासावर व्याख्यान संपन्न

देगलूर । शिवकुमार बिरादार

देगलूर,अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित, देगलूर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने व्यक्तिमत्व विकास या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमा पूजनेने झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डॉ.संजय पाटील व प्रमुख व्याख्याते प्रा.डॉ सर्जेराव रणखांब व प्रा.डॉ.माधव चोले उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा.विनोद काळे यांनी केले. कार्यक्रमांचे प्रमुख व्याख्याते प्रा.डॉ.सर्जेराव रणखांब यांनी आजच्या युगात मोबाईल




विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासात बाधा बनत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मोबाईलचा अति वापर करू नये असे सांगितले. त्यानंतर प्रा.डॉ.माधव चोले यांनी वाचनाने विद्यार्थी घडतो व आपोआप व्यक्तिमत्व खुलते असे सांगितले.तसेच अध्यक्षीय समारोपात प्रा.डॉ. संजय पाटील यांनी विद्यार्थ्यांना 'वाचाल तर वाचाल' सांगून विद्यार्थ्यांना आजची नौकरी बाबतची स्थिती सांगितली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.व्यंकट खंदकुरे यांनी केले व आभार प्रा. गणेश क्यादारे यांनी केले.या कार्यक्रमास महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner